# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 452/2020** **दिनांक: 26 /05/2020**

**प्रति,**

**जिल्हा शल्य चिकीत्सक,**
**अकोला**

**विषय :-** **कोविड-१९ साथरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ राज्यातील सर्व नागरीकांना सर्व अंगीकृत रुग्णालयांमार्फत उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**संदर्भ :-** **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. रास्वयो-२०२०/प्र.क्र.८०/आरोग्य-६, दि. २३ मे, २०२०**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यांत येते की, जगभर पसरलेल्या कोरोना विषाणुची लागण देशभर झाली असुन कोरोनाबाधीत संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात होत असलेली कोरोनाधीत रुग्णांची वाढीचा विचार करुन राज्याने उपरोक्त शासन निर्णय घेतला आहे. (शासन निर्णयाची प्रत संलग्न केली आहे.)

केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार राज्यामध्ये काही ठिकाणी कोविड-१९ रुग्णालये म्हणुन घोषित करण्यांत आलेली आहेत. या पार्श्वभुमीवर कोविड-१९ रुग्णांना अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेण्याकरीता आर्थिकबोजा पडू नये तसेच कोविड-१९ महामारीच्या संकटामध्ये सर्वच नागरीकांना आरोग्य विषयक हमी व आर्थिक दिलास मिळावा यासाठी मर्यादित कालावधीसाठी योजनेची व्याप्ती सर्व नागरीकांसाठी वाढविण्याचा प्रस्ताव राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून प्राप्त झाल्यानुसार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील उपचारांचा लाभ लाभार्थी रुग्णांबरोबर इतर रुग्णांना देखील मिळावा आणि शासकीय रुग्णालयाकरीता राखीव असलेल्या उपचार पध्दती उपलब्ध व्हाव्यात व योजनेतील अंगीकृत रुग्णालयातील डॉक्टर, इतर कर्मचारी व अनुषंगीक कर्मचारी यांना कोविड-१९ साथरोग प्रतिबंध संदर्भात आवश्यक साधन सामुग्री उपलब्ध व्हावी या पार्श्वभुमीवर संभाव्य परिस्थितीचा विचार करुन महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत कोरोनाबाधीत रुग्णांवर उपचार करण्याकरीता लाभार्थी रुग्णांबरोबर राज्यातील सदर योजनेचे लाभार्थी नसलेल्या इतर रुग्णांना देखील या योजने अंतर्गत अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये कोविड-१९ साठी उपचार अनुज्ञेय राहील. याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार लाभार्थ्याला रहिवासी पुरावा म्हणुन वैध पिवळी, केशरी, शुभ्र शिधापत्रिका, तहसिलदार यांचा दाखला व अधिवास प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक पुरावाजन्य कागदपत्र सादर करावे लागेल.

राज्यातील कोविड-१९ उद्रेकाची सद्यस्थिती पाहता महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत समाविष्ट नसलेल्या राज्यातील रहिवासी असलेल्या उर्वरित नागरीकांना सुध्दा या योजने अंतर्गतअनुज्ञेय ९९६ उपचार पध्दतीचा लाभ मान्यता प्राप्त दराने सर्व अंगीकृत रुग्णालयांमध्ये उपलब्ध करुन देता येईल असे शासन निर्णयात नमुद आहे.

कोविड-१९ साठी शासनाने जाहिर केलेल्या खाजगी अंगीकृत रुग्णालयांकडून कोरोना संशयीत रुग्णांवर उपचार करण्याकरीता वापरण्यांत येणा-या आवश्यक बाबींवर शासनाने ठरविलेल्या दरानुसार निधी देण्यांत येईल. याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेमार्फत संनियंत्रण केले जाईल व त्यांची सर्वस्वी जबाबदारी हि संबंधीत जिल्हा शल्य चिकीत्सक यांची राहील, असे स्पष्ट निर्देश संदर्भीय शासन निर्णयामध्ये देण्यांत आलेले आहेत

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, अकोला जिल्ह्यात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजना मार्फत काही रुग्णालये अंगीकृत करण्यांत आलेल्या अशा रुग्णांच्या वैद्यकिय उपचाराबाबत वरीलप्रमाणे दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे आधारे शासन निर्णयानुसार आपले मार्फत संनियंत्रण करावे तसेच यामध्ये कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष करु नये.

**तसेच याबाबत जिल्ह्यातील सद्यस्थितीतील कोरोना बाधीतांची वाढणारी संख्या विचारात घेता, या योजनेकरीता अजूनही काही खाजगी रुग्णालये अंगीकृत करणे आवश्यक आहे. त्याकरीता आपण जिल्हा समन्वयक अधिकारी, म.ज्यो.फु.अ.आ. योजना अकोला यांचेशी संपर्क साधुन त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या अशा रुग्णालयांचे यादीमधुन काही खाजगी रुग्णालये या योजनेची अंगीकृत रुग्णालये म्हणुन प्रस्तावित करावी.**

**सहपत्र :- वरीलप्रमाणे**

**(जितेंद्र पापळकर, भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी अकोला**

NitinN 305